लोकमत

# 'सायबर सिक्युरिटी; रविवारी व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनतर्फे सायबर कायदेतज्ज्ञ डॉ. प्रशांत माळी यांचे व्याख्यान रविवारी (दि. १४) आयोजित केले आहे. विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी १० ते दुपारी दोन या वेळेत 'सायबर सेक्युरिटी' या विषयावर त्यांचे व्याख्यान होईल. यावेळी प्र- कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे प्रमुख उपस्थित असणार आहेत.

# ‘हेल्पर्स’मध्ये कौतुक सोहळा

कोल्हापूर टाइम्स टीम

हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड, संस्थेच्या समर्थ विद्यालयात शालांत परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी शाळेतील इयत्ता १० वी च्या व घरोंदा वसतिगृहातील १२ वीच्या अव्वल आलेल्या विद्यार्थ्यांना एक लाख रुपये रकमेच्या विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार सुभाष धुमे, बँक ऑफ बडोदाचे निवृत्त शाखा व्यवस्थापक श्रीकांत धुमे, शिवाजी विद्यापीठाच्या ललित कला विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांविषयी त्यांच्या शिक्षकांचे मनोगत व पुरस्कार विजेत्यांचे मनोगत व्हिडिओ क्लिपद्वारे दाखविण्यात आले. यावेळी सुभाष धुमे म्हणाले, ‘प्रवाहाच्या बाहेर असणाऱ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम ‘हेल्पर्स’ करीत आहे. हे जगावेगळे कार्य आहे. हे कार्य पाहून कार्य करण्याची उर्जा मिळत राहते.’

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. नसीमा हुरजूक, उपाध्यक्ष पी. डी. देशपांडे, सचिव मनोहर देशभ्रतार, अनिल नाईक, सुधांशू नाईक,डॉ. अरुणा भिर्डी, अनंत घोटगाळकर, अविनाश सहस्रबुद्धे व मीरा सहस्रबुद्धे, विश्वस्त सुचित्रा मोर्डेकर, तेजश्री शिंदे, नंदकुमार मोरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



हेल्पर्स ऑफ दि हॅंडिकॅप्ड संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करताना डॉ. अंजली निगवेकर.

यामध्ये सर्वसाधारण विभागात पहिले तीन क्रमांक, शारीरिकदृष्ट्या अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थी विभागातील पहिले तीन क्रमांक, मेघःश्याम रामचंद्र कुलकर्णी स्मृती पुरस्कार, डॉ.श्रीपाद खंडो निगवेकर स्मृती पुरस्कार, डॉ. एस. एस. भिर्डी स्मृती पुरस्कार हे घरोंदा वसतिगृहात १२ वीच्या परीक्षेत प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांसाठीचे पुरस्कार, विज्ञान विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सौ.सरोजिनी प्रभाकर शुक्ल पुरस्कार, इंग्रजी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी डी. एस. तथा दादा नाईक स्मृती पुरस्कार, शिक्षणात येणाऱ्या विविध अडचणींवर मात करून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी सुचिता नाईक यांच्या स्मृती प्रित्यर्थ जिद्द पुरस्कार, शाळेचे विद्यार्थी असलेल्या व संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे पाल्य असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रजनी करकरे-देशपांडे स्मृती पुरस्कारांनी गौरविण्यात आले. याप्रसंगी शाळेच्या समर्थ वाचनालयातील मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर कक्षाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाले.

# दिव्यांगांना ग्रेस गुण; हजेरीत सवलत!

## विद्यापीठाच्या दंडकात सुधारणा; राज्यपालांची अंतिम मंजुरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाने राज्यपाल यांच्या अंतिम मंजुरीसाठी पाठविलेल्या दंडक सुधारणा प्रस्तावास अंतिम मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार दंडक ३१, ९४ मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या असून, दिव्यांग विद्यार्थांना ग्रेस गुणांसह हजेरीतही सवलत मिळणार आहे.

विद्यापीठाने ४ मार्च २०१७ च्या शासन निर्णयानुसार प्रक्रिया राबविल्या आणि त्यानुसार बदल केले. याबाबतचे परिपत्रक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी ९ जुलै रोजी काढले आहे.

विद्यापीठाच्या दंडक - ३१ प्रमाणे सर्व विद्यार्थ्यांसाठी कॉलेज, शैक्षणिक संस्था, विद्यापीठ अधिविभागात ७५ टक्के हजेरी आवश्यक होती.

> शासन आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठाने दंडक सुधारणा कार्यक्रम सर्व अधिकार मंडळापुढे ठेवून मान्यता घेतली. दंडक सुधारणा प्रस्तावास राज्यपालांनी मंजुरी दिली आहे. विद्यापीठ व परीक्षा विभागाची विद्यार्थी केंद्रित भूमिका राहिली आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना याचा नक्कीच फायदा होणार आहे. इतर दंडकांचाही विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येईल.
>
> \- **महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के उपस्थिती ठेवली आहे. विद्यार्थ्यांना यापूर्वी एका विषयाला २ ते १० ग्रेस गुण (वाढीव गुण) दिले जात होते. दिव्यांग विद्यार्थसाठी सेमीस्टरच्या एकूण गुणांच्या ३ टक्के गुण आवश्यकतेनुसार कितीही विषयात वाटून देता येणार आहेत. याचा पाचशेहून अधिक दिव्यांग विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे.

**कोल्हापूर महानगरपालिका- शहर पाणी पुरवठा विभाग**

# विद्यापीठात रविवारी सायबर सिक्युरिटी मार्गदर्शन कार्यशाळा

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १४) सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत मानव्यशास्त्र सभागृहात सायबर सिक्युरिटी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन केले आहे. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार कार्यशाळेचे उद्घाटन होईल. जिल्हा नागरी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. बँक अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी ही कार्यशाळा असून सायबर कायदेतज्ज्ञ ॲड. प्रशांत माळी, मुंबई 'सायबर सिक्युरिटी' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. कार्यक्रमास विविध बँकांचे अधिकारी, कर्मचारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन उद्योजकता व कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, बँक असो.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल नागराळे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUL 2019
तरुण भारत

# तैवान सामाजिक मानसशास्त्र परिषदेसाठी डॉ. कराडे रवाना

प्रतिनिधी
कोल्हापूर

एशियन असोसिएशन ऑफ सोशल सायकॉलॉजी (एएएसपी), ताईपे यांच्यातर्फे १० ते १२ जुलै या कालावधीत तैवान येथे आंतरराष्ट्रीय सामाजिक मानसशास्त्र परिषद आयोजित केली आहे. या परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जगन कराडे रवाना झाले आहेत. मायग्रेशन अँड अनऑर्गनाईज्ड सेक्टर इन इंडिया : ए केस स्टडी ऑफ कोल्हापूर सिटी या विषयावर ते शोधनिबंध सादर करणार आहेत. यापूर्वी त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अकरा संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. यातील दोन ग्रंथ केंब्रिज स्कॉलर पब्लिकेशन, लंडन येथून प्रकाशित



झाले आहेत. त्याचबरोबर ते राज्य पातळीवर कार्यरत असणाऱ्या मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्षस्थान भूषविले आहे. तसेच राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणाऱ्या इंडियन सोशिओलॉजीकल सोसायटी या संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर ते सदस्य म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) व टोरांटो (कॅनडा) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्येही सहभाग घेतला होता. याचबरोबर टोरांटो येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये डब्ल्यूजी-०५ या संशोधन समितीमध्ये त्यांची निवड झाली आहे.